# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २००- २३** **दिनांक : - २४/०६/२०२३**

## ॲपवरुन ओळख करुन राहण्यासाठी नविन रुम देतो असे सांगून जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांस १२ तासांत अटक. पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १९/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास फिर्यादी नामे नासिर अली अहमद अली, रा. श्रीधर कंपाउंड, गांगरीपाडा, धानिवबाग, नालासोपारा यांना त्यांचे मोबाईल फोन वरुन आरोपीत यांनी बुल्लु या ॲपवरुन ओळख करुन राहण्यासाठी वलईपाडा येथे नविन रुम घेवुन देतो असे सांगून आरोपीत यांनी फिर्यादीस बोलावुन रुम दाखवण्याकरीता ठाकुर कंपाउंड, नरेंद्र नगर, संतोष भवन येथे घेवुन गेले व आपले आणखी तीन साथीदारांना बोलावुन फिर्यादीस लाकडी दांडक्याने मारहाण करुन फिर्यादीचे डाव्या हाताचे मनगटाजवळ, डोक्यास, पायास जबर दुखापत केली व हात फॅक्चर करुन त्यांचे जवळील मोबाईल फोन व रोख रक्कम जबरीने काढुन घेवुन पळुन गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन ४ अज्ञात आरोपीतांविरुध्द पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.नं.ा ५९०/२०२३ भा. दं. वि. सं. कलम ३९४, ३४ अन्वये दिनांक २१/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट दिली व गुप्त बातमीदारांमार्फत प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत नामे १) हिमांशु संतोष गुप्ता, २) शुभम यादव तसेच २ विधिसंघर्षित बालक यांना ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता वर नमुद गुन्हा त्यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने अनुक्रमे आरोपी क्र ०१ व ०२ यांना दिनांक २१/०६/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक केली असुन त्यांचेकडून गुन्हयातील जबरी चोरी केलेला १०,०००/- रुपये किंमतीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे, , पो.नि. श्री. महेंद्र शेलार (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अंम. रवि वानखेडे, संजय मासाळ, किरण आव्हाड, दिलदार शेख, निखिल मंडलिक, अनिल साबळे यांनी केली आहे.

----oooo----